# राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत

## आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया

## “दोन दिवशीय अभ्यास दौरा”

## दिनांक ः १३ फेब्रुवारी २०१३ ते १४ फेब्रुवारी २०१३

स्थळ ः **मानवलोक मराठवाडा ग्रामीण लोकायन ता. अंबाजोगाई जि. बीड**

## सादरकर्ते

**जिल्हा समन्वयक संस्था ः मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) , औरंगाबाद**

# “दोन दिवशीय अभ्यास दौ याचा अहवाल”

**सहभागी संस्था ः १ .मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) वैजापुर ता . वैजापुर जि . औरंगाबाद**
**२ . अब्दुल सलाम पठाण ग्रामीण विकास संस्था सोयगाव ता . सोयगाव जि . औरंगाबाद**

**भेटीचे ठिकाण ः मानवलोक मराठवाडा ग्रामीण लोकायन ता . अंबाजोगाई जि . बीड**

## दि . १३ .0२ .२0१३ ते १४ .0२ .२0१३

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख न नियोजन प्रकिया मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) वैजापुर व अब्दुल सलाम पठाण ग्रामीण विकास संस्था सोयगाव जिल्हा औरंगाबाद येथे राबवत आहे . प्रकियेचा एक भाग म्हणुन इतर सहभागी जिल्हयामधील संस्था संघटनाच्या कार्यक्षेत्रात जाऊन प्रकिया समजावून घेणे व अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी मानवलोक मराठवाडा ग्रामीण लोकायन ता . अंबाजोगाई जि . बीड येथे दि . १३ ते १४ फेब्रवारी २0१३ रोजी लर्नीग भेट आयोजित केली होती .

सदरिल दोन दिवशीय कार्यकमामध्ये दोन्ही तालुका समन्वयक संस्थेचे सदस्य उपस्थित होते .

ते खालील प्रमाणे

| **अनु क .** | **सहभागीचे नाव** | **संस्थेचे नाव** | **पद** |
|---|---|---|---|
| १ | साधना गंगावणे | मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) औरंगाबाद | जिल्हा समन्वयक |
| २ | अर्जुन जगताप | मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) वैजापुर | तालुका समन्वयक |
| ३ | शिला पवार | मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) वैजापुर | मानसेवी काार्यकर्ती बोरसर ता . वैजापुर |
| ४ | गंगुबाई वाघ | मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) वैजापुर | मानसेवी कार्यकर्ती गाढेपिंपळगाव ता . वैजापुर |
| ५ | रतन पठारे | मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) वैजापुर | प्रा .आ .समिती सदस्य भिवगाव ता . वैजापुर |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | नानासाहेब शिंदे | मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) वैजापुर | ता.आ. समिति सदस्य ता. वैजापुर |
| ७ | शारदा पठारे | मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) वैजापुर | ग्रा.आ.पो.पा.पु.व स्व. स.सदस्य भिवगाव ता. वैजापुर |
| ८ | मनिष पवार | मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) वैजापुर | प्रा.आ.समिती सदस्य बोरसर ता. वैजापुर |
| ९ | वैभव पाटील | मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGVS) वैजापुर | सदस्य बोरसर ता. वैजापुर |
| १0 | अशपाक पठाण | अब्दुल सलाम पठाण ग्रामीण विकास संस्था, सोयगाव | प्रकल्प संचालक तथा तालुका समन्वयक |
| ११ | सरूबाई बडक | अब्दुल सलाम पठाण ग्रामीण विकास संस्था, सोयगाव | मानसेवी कार्यकर्ती बनोटी व जरंडी ता. सोयगाव |
| १२ | विशाल अंगाईत | अब्दुल सलाम पठाण ग्रामीण विकास संस्था, सोयगाव | मानसेवी कार्यकर्ती सावळदबारा ता. सोयगाव |
| १३ | प्रमोद साखरे | अब्दुल सलाम पठाण ग्रामीण विकास संस्था, सोयगाव | प्रा.आ.समिती सदस्य सावळदबारा ता. |
| १४ | दिलीप देशमुख | अब्दुल सलाम पठाण ग्रामीण विकास संस्था, सोयगाव | प्रा.आ.समिती सदस्य |
| १५ | मथुराबाई श्यामसिंग परदेशी | अब्दुल सलाम पठाण ग्रामीण विकास संस्था, सोयगाव | सदस्य बनोटी ता. सोयगाव |

## पहिला दिवस ः

सदरिल दि.१३.0२.२0१३ रोजी मानवलोक मराठवाडा ग्रामीण लोकायन ता. अंबाजोगाई जि. बीड या संस्था मार्फत प्राथमिक आरोग्य केंद्र आपेगाव ता. आंबेजोगाई जि. बीड येथे जनसंवाद कार्यक्रमात स. ११.३0 वाजता सर्व सदस्यासोबत पोहचलो असता नियोजित जनसंवादाचा कार्यक्रम हा जागेअभावी जयकिसान माध्यमिक विदयालय आपेगाव येथे घेण्यात आला.

जनसंवादाची सुरूवात दु. १२.00 वाजता बचत गटातील महिलांनी गायनाने केली. गायनामध्ये महिलांनी समाज प्रभोधनपर गीत व आरोग्यविषयी माहिती दिली.हॉलमध्ये व बाहेर सर्व ठिकाणी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख न नियोजन प्रक्रिये विषयी पोस्टर लावण्यात आले होते. पोस्टरमध्ये खालील विषयावर सविस्तर माहिती दिली होती.

१.गावपातळीवर मिळणारा निधी
२. शासनाने गावपातळीवर दिलेल्या योजना
३. उपकेंद्रात मिळणा या आरोग्यविषयी योजना सुविधा
४. 'आशा' मान्यताप्राप्त सामाजिक कार्यकर्ती
५. गावपातळीवर मिळणा या आरोग्य सेवा सुविधा
६.अन्न नागरी संदर्भातल्या योजना विषयी माहिती देण्यात आली होती.

दु.१२.४५ वाजता प्रमुख अतिथी व पॅनालिस्ट यांचे आगमन झाले. पॅनालिस्टमध्ये आरोग्य शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रय तट ,तालुका पंचायत समिती सभापती तथा तालुका आरोग्य देखरेख व नियोजन समिती सदस्य श्री प्रदीप गंगणे ,तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोरे, सामाजिक कार्यकर्ते श्री रेडडी ,मानवलोक संस्थेचे प्रकल्प संचालक श्री अनिकेत लोहीया इत्यादी सहभागी होते. सर्व प्रथम मान्यवरांचे हार देऊन स्वागत करण्यात आले.

जनसंवादाची प्रस्तावणा डॉ. विनायक गडेकर यांनी थोडक्यात सांगितले. जनसंवादाचे महत्व सांगुन कार्यक्षेत्रात ज्या अडचणी आहेत त्यासोडवण्यासाठी प्रयत्न करणे.देखरेखीचे महत्व सांगून प्राथमिक आरोग्य केंद्र आपेगाव येथे काम करत असताना आलेल्या अडचणी किंवा सुटलेले मुद्दे व न सुटलेले मुद्दयांवर संवाद साधण्यात आला.

थोडक्यात न सुटलेले मुद्दे खालील प्रमाणे

१. औषधांचा तुटवडा

२. कर्मचा यांची रिक्त पदे

३. प्रा. आ. कें. तील पाण्याची व्यवस्था नाही.

४. केंद्रातील उपकरणाचा वापर केला जात नाही.

५. नविन प्रा. आ. केंद्रातील काही कक्षात पाणी गळते.

६. अधिकारी चांगल्या दर्जाची सेवा देत नाही.

७. लाभार्थीला वाहन व्यवस्था वेळेवर भेटत नाही.

८. गाव ते प्राथमिक आरोग्य केंद्र येथे मिळणा या निधीबाबत नियोजन नाही. तसेच

सुटलेले मुद्दे पुढीलप्रमाणे आहे.

१. लोकप्रतिनिधीचा देखरेख व नियोजन प्रक्रियेत सहभाग वाढल्याने काही प्रमाणात निर्णय घेण्यास पुढाकार घेऊ लागले.

२. प्रत्येक स्तरावर रूग्ण कल्याण समितीची बैठक घेण्यात येथे कारण येथे मा. सभापती स्वतः लक्ष घातले असल्याने हा बदल दिसून आल्याचे स्पष्ट होते.

३. अंगणवाडीमध्ये मुलांची आरोग्य तपासणी होऊ लागली.

४. आशा कार्यकर्तीला कामाचा मोबदला वेळेवर मिळू लागला.

५. उपकेंद्रावर काही प्रमाणात सेवा हया चांगल्या भेटण्यास सुरूवात झाली.

६. नविन इमारतीचे बांधकाम बंद होते ते पुन्हा सुरू झाले. इत्यादी मुद्दयावर सर्व उपस्थित जनसमुदयासमोर चर्चा करण्यात आली. तेव्हा पॅनालिस्टने आपसात चर्चा केली व जे प्रश्न पुढे आले त्यावर आपले मत मांडले. श्री अनिकेत यांनी सांगितले कि शासकिय कर्म चारीने कामाच्या ठिकाणी राहणे आवश्यक आहे. डॉ. ना किती पगार आहे हा पगार आपल्या खिश्यातून दिला जातो. लाभार्थीने आरोग्यविषयी सेवा हया सरकारी दवाखााण्यातुनच घेतल्या पााहिजे. येथे चुकी जेवढी शासकिय कर्मचा यांची आहे तेवढीच लाभार्थीची आहे. नेत्यांनी जे बलीदान दिले ते असे वातावरण पाहिले कि व्यर्थ गेल्यासारखे वाटते.

माननिय सभापती श्री गंगणे यांनी शासकिय कर्मचारीला न घाबरता आपले हक्क

घ्या. ते आपले नौकर आहे त्यांना अजिबात घबरू नका.जर अंजनी गावात बदल होऊ शकतो तर आपेगावात का नाही. परंतु जोपर्यंत आरोग्य व शिक्षणाच्या बाबतीत आपण जागृत होत नाही तो पर्यंत गाव सुधरणार नाही.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.




आपेगाव येथील जनसंवादात सहभागी जनसमुदाय व पॅनालीस्ट

जनसंवादा कार्यक्रम संपल्यानंतर तालुका आरोग्य देखरेख व नियोजन समितीचे अध्यक्ष तथा पंचायत समिती सभापती श्री प्रदिप गंगणे व इतर सदस्य यांच्यासोबत प्रक्रिया कशा प्रकारे राबवली व प्रक्रिया राबवत असताना आलेल्या समस्या कशा पध्दतीने सोडवल्या हयाबाबत चर्चा करण्यात आली. त्यावर सभापती यांनी सांगितले कि कोणतेही काम मनापासुन केले तर फळ हे नक्कीच भेटते. त्यासाठी आपणाच योग्य मार्ग अवलंब करायचा तो व सर्व लोकांच्या कल्याणाचा असेल . पक्षपाती किवां राजकारण येथे आम्ही करत नाही करू देत नाही .आम्ही प्रक्रिया दरम्याण असलेल्या गावातच नाही तर इतरच्याही जवळच्या गावात हि प्रक्रिया राबवली आहे.



सभापती श्री प्रदिप गंगणे यांच्यासोबत चर्चा करताना समिती सदस्य



मानवलोक संस्थेचे प्रकल्प संचालक श्री अनिकेत लोहियासोबत प्रक्रियविषयी महिती घेताना वैजापुर व सोयगाव येथील समिती सदस्य

## भेटी दरम्यान आलेले अनुभव पुढिल शिक्षणासाठी मुद्दे

१. जनसंवादासाठी जिल्हा आरोग्य देखरेख व नियोजन समितीचे सदस्य किंवा जिल्हा सुकाणू समितीचे सदस्य येणे अपेक्षित नही तर येथे सेवानिवृत्त झालेले वैदयकिय अधिक्षक, सामाजिक कार्यकर्ता यांना बोलवू शकतो. थोडक्यात पॅनल कशा प्रकारे घेऊ शकतो ? हे बघायला भेटले.

२. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतार्गत आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया राबवताना समिती सदस्यांनी जास्त सहभाग घेऊन अधिक बळकट बनवने आवश्यक आहे.

३. समिती सदस्य व गावकरी एकत्र आले तर खरच आरोग्य यंत्रणेत बदल होते हे येथे आजच्या जनसंवादाच्या माध्यमातुन शिकायला भेटले.

४. समिती सदस्यांचे वारवांर प्रक्रियेबाबत समजावुन सांगणे. जेणे करून कोणतीही अडचण येत नाही.

५. गावकरीने प्रक्रिया आपल्या कल्याणासाठी असुन आपला सहभाग किती महत्वाचा आहे ? हे आजच्या उपस्थितीवरून दिसुन आले.

६. वेळेवर झालेल्या कार्यक्रमाचा अहवाल सादर करणे.

७. सर्व मिळुनच प्रक्रिया पुढे नेऊ शकतो एकटयाने काही होत नाही.

८. जनसंपर्क जेवढा जास्त तेवढीच प्रक्रिया जनतेपर्यंत नेण्यास सुलभ .

दुसरा दिवस ः

मानवलोक मध्ये सकाळी ८.३० वाजता संस्थेचे अध्यक्ष डॉ. लोहिया ‘बापुजी’ यांच्या अध्यक्षतेखाली सर्व कर्मचारीची मिटींग घेण्यात आली. सर्व प्रथम गायणाने सुरूवात केली. त्यानंतर एकमेकांची ओळख करून घेतली व अभ्यास दौ याचा उद्देश सांगितला . डॉ. लोहिया यांनी मानवलोकचे काम हे चार तत्वावर चालू आहे.

१. मानवलोकचे हिशोब रस्त्यावर
२.पावने पाच वर्ष दिवाळी व पंधरा दिवस शिगमा
३. श्रमदानाने दिवसाची सुरूवात
४. गावातला मणूस गावात इ.

एकीकडे रचनात्मक तर दुसरीकडे घर्षणात्मक कार्यक्रमातुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.त्यानंतर मानवलोकाचे कर्मचारीने श्रमदानाने कामाला सुरूवात केली.



मानवलोकचे संस्थापक डॉ. लोहिया व तेथील कर्म चरी मानवलोक येथील कार्यक्रमाबद्दल माहिती देताना

सकाळी ११.00 वाजता भावठाणा येथे भेट दिली असता सरपंच सौ. कौसल्या तातेराव जाधव उपसरपंच श्री पुंडलीक शिवाजी जाधव व समिती सदस्याच्या उपस्थित चर्चा करण्यात आली.येथे सुध्दा असे प्रश्न आहे कि ते प्रकिया सुरू होऊनही सुटलेले नाही .

उदा.

१. भावठाणात एक हि घरात सौचालय नाही म्हणजेच गाव अजुनही हगणदारी मुक्त नाही.
२. अंगणवडीचा प्रश्न गेल्या २० वर्षापासुन पडुन आहे त्यात राजकरण पुढे येते.
३. प्राथमिक आरोग्य केंद्र हे गावाच्या बाहेर आहे.
४. पाण्याची व्यवस्था चांगल्या प्रकारची नाही. इत्यादी

सदस्यांसोबतच्या चर्चेतुन असे लक्षात आले कि , गावातील सदस्यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. जोपर्यंत सदस्य जास्त सहभाग घेत नाही तोपर्यंत हि प्रकिया योग्य प्रकारे वाटचाल करू शकत नाही. दोन ते तीन सदस्य सोडले तर इतर सदस्य काही बोलताना दिसले नाही.




अभ्यासदौ या दरम्यान भावठाणा गावात समितीच्या अध्यक्षा तथा सरपंच सौ . कौसल्या तातेराव जाधव व समिती सदस्यासोबत प्रकियाबाबत महिती घेत असताना वैजापुर व सोयगाव येथील स्टाफ व समिती सदस्य

दुपारी १.४५ वाजता प्राथमिक आरोग्य केंद्र भावठाणा येथे भेट दिली असता वैदयकिय अधिकारी डॉ. दिपक फुटाणे यांच्यासोबत ओळख करून दिली व भेटीचा उद्देश सांगितला असता डॉक्टरांची त्यांना येणा या समस्याबाबत सांगितले कि, येथे नर्सला व वैदयकिय अधिकारी यांना राहण्यासाठी

निवासी व्यवस्था योग्य दर्जाची नाही.रात्री जर केंद्रात रूग्णाला बघण्यासाठी आले तर पेशंटच्याच बेडवर झोपावे लागते. क्वार्टस्‌ला खिडकी नाही मोठमोठे साप येतात अशावेळी आमची काय सोयच नाही. जर तुम्ही म्हणता कि वैदयकिय अधिकारीने निवासी राहिले पाहिजे तर तशा सेवा दया. गावकरी सेवा घेण्यासाठी येतात परंतु त्यांना देखिल दुर आहे. औषधी साठा उपलब्ध होता. दवाखाण्या बाहेर दवाखाण्याची वेळचा बोर्ड लावलेला होता.



प्राथमिक आरोग्य केंद्र भावठाणा येथे भेट देऊन समिती सदस्यानी सेवाबाबत समजावून घेत असताना

दुपारी २.४५ वाजता मानवलोक येथे अहवालाविषयी माहिती करून घेतली असता डॉ. गाडेकर यांनी सर्व उपस्थित सदस्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन केले. पुढे ते म्हणाले कि, कोणतेही काम दडपणाखाली करता येत नाही व आमच्या येथे कोणतेही काम आम्ही एकजुटीने करतो . मासिक अहवाल इतरही रिपोर्ट करताना काय करायला पाहिजे ? याबद्दल सांगुन गाव पातळीपासुन ते जिल्हा पातळीपर्यंत सर्व प्रश्न हे लिखीत ठेवले पाहिजे.

## भेटीदरम्यान आलेले अनुभव पुढिल शिक्षणासाठी मुद्दे ः

१ .मानवलोकचे नियोजन व त्याप्रमाणे कामाची पध्दत ही कशी आहे ? व ती कशी असायला पाहिजे ? हे शिकलो .

२ . कार्यकर्ता कल्याणकारी योजना बाबत माहिती घेण्यात आली .

३ .गाव, उपकेंद्र ,प्राथमिक आरोग्य केंद्र ,तालुका पातळीवरील ग्रामीण रूग्णालय येथील समस्या आहेत व ज्या सुटल्या नाही . त्याचा पाठपुरावा करूनही सटले नाही तर अशा समस्या हया राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मुंबई येथे लिखीत स्वरूपात पाठवणे .

४ .वाचणावर जास्तीत जास्त भर देणे .

५ . अहवाल व नियोजन कसे असायला पाहिजे . हयाविषयी माहिती भेटली .

६ .सर्वाना जबाबदारी दिली सर्व काम चांगले व दर्जेदार होते .

७ . संस्थेचे कार्यकर्ते हे कामाची सुरूवात श्रमदानाने करतात . म्हणजेच बदल करण्यास हा स्वताः पासुन सुरूवात केली तर ते दुस यांना सांगताना कमी वाटत नाही .

८ . सस्थेंमध्ये एकजुट असायला पाहिजे म्हणजे ध्येय गाठण्यास अवघड जात नाही .

# धन्यवाद !